# मायेचीसरिता

होतीस कधी तू प्रेमाची कट्यार,
तर कधी माझ्या संरक्षणाची ढाल;
तुझ्या बोलीत होते संस्कारांचे सारे सार,
जणू तूच केलास आयुष्याचा उद्धार!

मार्ग दाखवलास तू कधी प्रेमाचा,
तर कधी सत्याचा,
शाळेच्या विश्वात,
दिलास तू एका कुटुंबासारखा आधार.

वाघीणीसारखे दिलेस तू चूकांना शब्दांचे मार,
पण आईसारखे केलेस तू सर्वांचे लाड;
एक दिवस जरी नाही आलीस,
तर व्हायचे घरट्यात हाल;
तुझ्या बाजूला बसूनि,
वाटायचे जणू प्रेमाने भरले संपूर्ण आभाळ!

घरट्यात तुझ्यापाशी राहण्याचा
वेळ जरी संपला,
तरीही विझली नाही तुझ्या मायेचीवात;
त्या वाघीणीची सावली अदृश्य होत आहे,
जीवनात आता एकटेच लढायचे आहे.

एकच प्रश्न मनाला त्रस्त करत आहे-
आई, तू पुन्हा येशील का?
तुझ्या अभंग प्रेमाची जादू,
ह्या आयुष्यावर करशील का?



- भाग्यश्री प्रभुतेंडोलकर,
8C.

20.3.2018

O GREAT LEGEND,
I'm Highly
INDEBTED To You!